जिल्हा परिषद / पंचायत समिती कार्यालयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई विषय हाताळणा-या व टँकरची देयके तयार करणा-या कर्मचा-यांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत .

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र. १३ /पापु १४
जी. टी. रुग्णालय संकुल, ७ वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक : २८ मार्च, २०१९

वाचा :-

१) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक : टंचाई २०१९/प्र.क्र.०३/पापु-१४, दिनांक १९ जानेवारी, २०१९

२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एससीवाय१२/२०१८/प्र.क्र ६८/म-११, दिनांक २७ मार्च, २०१९

३) संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा) नाशिक यांचे पत्र क्रमांक : मित्रा /तांशा- २/२१५/२०१९, दिनांक १८.०२.२०१९

प्रस्तावना -

तहसिल स्तरावर पंचायत समिती कार्यालयातील जी. पी.एस. यंत्रणेद्वारे झालेल्या माहितीच्या आधारे टँकर्सच्या फे-यांची माहिती घेऊन त्याआधारे देयक बनाविणा-या संबंधित कर्मचा-यांना याबाबतचे विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यास व त्यासंबंधीचा खर्च टंचाई अंतर्गत प्राप्त होणा-या निधी मधून अदा करण्यासंदर्भात मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उप समितीच्या दिनांक ०३.०१.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यतेसाठी विचारात घेऊन त्यास सहमती देण्यात आली. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती कार्यालयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई विषय हाताळणारे पिण्याच्या पाण्याच्या व टँकर्सची देयके तयार करणा-यां संबंधित कर्मचा-यांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अंतर्गत नाशिक येथे कार्यरत असलेल्या “मित्रा” (महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी आणि संशोधन संस्था) या संस्थेत एक दिवसीय प्रशिक्षण आयोजित करण्यास संदर्भाधीन क्रमांक -१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली होती.

सदर आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमावरील खर्चाची प्रतिपूर्ती करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>-

महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) यांनी त्यांच्या दिनांक २७ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये रु. ३,६५,८००/- (अक्षरी रुपये तीन लाख पासष्ट हजार आठशे फक्त) एवढा निधी आर्थिक वर्ष सन २०१८-१९ मध्ये संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक यांना सोबतच्या विवरणपत्रा नुसार मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

०२. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग- चार च्या विवरणपत्रातील अनुक्रमांक १० नुसार, प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय प्राधिकाराचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

०३. सदर रक्कम खर्च झाल्यानंतर विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र शासनास तात्काळ सादर करावे.

०४. प्रमाणित करण्यात येते की, मंत्रीमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार आयोजित करण्यात आलेले प्रशिक्षण हे सुयोग्यरित्या देण्यात आले आहे.

०५ जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती कार्यालयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई विषय हाताळणारे पिण्याच्या पाण्याच्या व टँकर्सची देयके तयार करणा-यां संबंधित कर्मचा-यांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अंतर्गत नाशिक येथे कार्यरत असलेल्या “मित्रा” महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी आणि संशोधन संस्था) या संस्थेत एक दिवसीय प्रशिक्षण रक्कम रुपये रु. ३,६५,८००/- (अक्षरी रुपये तीन लाख पासष्ट हजार आठशे फक्त) एवढी रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), (श्री. पां. रा. खोटरे) यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री. चेतन निकम), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम (श्री. पां. रा. खोटरे), आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोखशाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्नंतर स्वतंत्र धनादेशाद्वारे रक्कम संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा),

नाशिक यांच्या बँक खात्यात जमा करावी. संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक यांनी सदर रक्कम शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार खर्च करावी.

०६ याबाबत होणारा खर्च मागणी क्र. सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य, ०१-अवर्षण, १०२ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, ९२ - राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकाव्यतिरिक्त खर्च, (९२)(०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५ २१८५), ३१, सहाय्यक अनुदाने(वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

०७. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे परिपत्रक क्रमांक : अर्थसं- २०१८/ प्र.क्र. ६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ अनुसार प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या प्राधिकरणानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकातील अनुक्रमांक ७ ते ८ मधील अटींची तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मधील तपासणी सूचीतील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता करण्यात येत आहे.

०८ उपरोक्त रकमेचा धनादेश "Superintending Engineer, Maharashtra Environmental Engineering Training & Research Academy, Nasik" यांच्या नावे काढण्यात यावा.

०९. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकतेस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक २०१९०३२७१७२७४३९१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2019.03.28 17:19:18 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर

३. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७. संचालक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
८. संचालक, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा) , नाशिक
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१०.विभागीय आयुक्त, नाशिक
११.जिल्हाधिकारी, नाशिक
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक
१३.जिल्हा कोषागार अधिकारी
१४. अवर सचिव (रोखाशाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक
१६.पापु १४ (निवडनस्ती)

विवरणपत्र- अ

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. टंचाई - 2019 / प्र.क्र. 13/ पापु -14, दिनांक 28 मार्च, 2019 चे सहपत्र.

मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दि. 03.01.2019 रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिल्यानुसार GPS system च्या आधारे टँकर्सचे देयके तयार करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या पंचायत समिती कार्यालयातील कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण.

Amount In Rs.

Sr. No.	Description	Period of Training	Bill No.	No. of Participants	No. of Days	Rate	Amount	Field visit ammount	Total	GST 18 %	Gross Amount
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12
1	One day workshop on GPS system	11.01.2019 to 11.01.2019	359	123	1	2000	246000	0	246000	44280	**290280**
2	One day workshop on GPS system	31.01.2019 to 31.01.2019	360	32	1	2000	64000	0	64000	11520	**75520**
	Total						**310000**	**0**	**310000**	**55800**	**365800**

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2019.03.28 17:19:46 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन